पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ब प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक १
-- सभावृत्तांत --

दिनांक : ०५/०४/२०१३ वेळ: सकाळी ११.३० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची अध्यक्ष निवडीची विशेष सभा शुक्रवार दिनांक ०५/०४/२०१३ रोजी सकाळी ११.३० वाजता **महापालिका सभागृह**, पिंपरी चिंचवड महापालिका, पिंपरी १८ येथे मा. श्री. अनिल कवडे, पीठासीन अधिकारी तथा मुख्यकार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद पुणे, यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. नेटके सुमन राजेंद्र
२. मा. चिंचवडे-पाटील अश्विनी गजानन
३. मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४. मा. पालांडे सुजाता सुनिल
५. मा. पवार यमुनाताई रमणनाना

याशिवाय मा.श्री. ए.वाय.कारचे, प्रभाग अधिकारी, ब प्रभाग, मा.श्री. एस.एन. राऊत, प्रशासन अधिकारी, ब प्रभाग इत्यादी अधिकारी सभेस उपस्थित होते.

प्रथम प्रभाग अधिकारी श्री. ए.वाय.कारचे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन दिनांक ०४/०४/२०१३ रोजी विहीत मुदतीत प्राप्त झालेले दोन नामनिर्देशन पत्रे वाचून दाखविली व पिठासिन अधिकारी यांचेकडे सुपूर्द करुन पुढील कार्यवाही सुरु करुणेबाबत विनंती केली. सदर दोन्ही नामनिर्देशन पत्रामधील उमेदवारांचे सुचक व अनुमोदक खालील प्रमाणे होते.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचक | अनुमोदक |
|---|---|---|---|
| १ | मा.पवार यमुनाताई रमणनाना | मा.बहल योगेश मंगलसेन | मा.नेटके सुमन राजेंद्र |
| २ | मा.पवार यमुनाताई रमणनाना | मा.ठाकरे मंदाकिनी अर्जून | मा.नेटके सुमन राजेंद्र |

वरीलप्रमाणे ब प्रभाग समिती सभापती अध्यक्ष पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली व ते वैध ठरवण्यात आले. त्यामध्ये मा.ब प्रभाग समिती सभापती पदाची निवडणुक लढविणारे मा.पवार यमुनाताई रमणनाना या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक :- १ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ०५/०४/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समिती सभापती पदासाठी एकमेव अर्ज मुदतीत दाजल झाला तो वैध ठरवण्यात आला आहे. सदर उमेदवारी अर्ज मागे घेण्याकरिता १५ मिनीटांचा अवधी दिला असता सदर कालावधीमध्ये उमेदवारांनी अर्ज माघारी घेतला नसल्याने मा. ब प्रभाग समिती सभापती पदाची निवडणुक लढविणारे मा.पवार यमुनाताई रमणनाना या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने मा.पवार यमुनाताई रमणनाना यांची ब प्रभाग समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करणेत आले.

**सही/-**
(अनिल कवडे)
पीठासीन अधिकारी
तथा
मुख्यकार्यकारी अधिकारी
पुणे जिल्हा परिषद पुणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ब प्रभाग कार्यालय
क्र. बप्र/२/कावि/०४/२०१३
दिनांक :-०५/०४/२०१३

**प्रशासन अधिकारी**
**सभाशाखा ब प्रभाग समिती**
**पिं.चिं.म.न.पा.**